क्रमांक:एचईडी/१६८९/५७०/सीआर/२७२/८९/एमईडी-७.
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:२७:ऑक्टोबर:१९८९.

प्रति,

व्यवस्थापकीय विश्वस्त,
मोतीवाला एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर ट्रस्ट,
१०१ पटेल चेंबर्स. जी. पी. ओ. रोड.
नाशिक -४२२००१.

विषय:- मोतीवाला एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर ट्रस्ट, १०१ पटेल चेंबर्स, जी. पी. ओ. रोड. नाशिक-४२२००१ यांना नाशिक येथे होमिओपॅथीक पदविका महाविद्यालय सुरु करण्याबाबत.

महोदय,

आपल्या दिनांक २३ सप्टेंबर १९८९ च्या वरील विषयाबाबतच्या पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की मोतीवाला एज्युकेशन ॲन्ड वेल्फेअर ट्रस्ट, नाशिक यांना नाशिक येथे खालील शर्तीवर नवीन होमिओपॅथीक पदविका-डिप्लोमा- इन होमिओपॅथीक मेडिसीन व सर्जरी [डी. एच. एम. एस. ] ह्या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालय सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष १९८९-९० या एका वर्षासाठी शासन तात्पुरती [प्रोव्हीजनल ] परवानगी देत आहे.

१] विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ५० राहील. त्या प्रवेश क्षमतेचे काटेकोरपणे पालन केले जाईल.

२] शासकीय अनुदान दिले जाणार नाही.

३] केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांनी विहीत केलेला पूर्णवेळ अध्यापक वर्ग नेमला जाईल.

४] महाविद्यालय सुरु केल्यापासून सहा महिन्याच्या आत शिक्षक कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी वर्ग याबाबतीत जर काही कमतरता असेल तर ती भरुन काढली पाहिजे.

५] पुरेशा निधी अभावी शैक्षणिक दर्जावर विपरीत परिणाम होणार नाही याची संस्था कटाक्षाने दक्षता घेईल.

६] डी. एच. एम. एस. अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना शासनाच्या प्रवेश नियमावलीचे पालन केले जाईल.

७] संस्थेने होमिओपॅथी पदविका महाविद्यालय सुरु केल्यानंतर सहा महिन्याच्या आत केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांची महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी मिळवावी.

८] संस्थेने महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीक, मुंबई यांची मान्यता मिळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे याबाबतीत पुढे त्यांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन करु नये.

९] शासनाच्या प्रचलित नियमानुसार मागासवर्गीयांकरिताच्या आरक्षणाबाबतची घेतली जावी.

१०] संस्थेचे स्वतःचे सुसज्ज व उपकरणे इत्यादींसहित २५ रुग्णशय्येचे होमिओपॅथी औषधी असलेले रुग्णालय असावे व त्यामध्ये ६०% रुग्णशय्या होमिओपॅथीक मेडि २०% गायनेक आणि २०% शल्यकर्म यासाठी ठेवणे आवश्यक आहे.

११] संस्थेचे स्वतःचे वस्तुसंग्रहालयांनी युक्त असे वेगवेगळे शिक्षण विभाग, पाठ्यपुस्त ग्रंथालय, शवविच्छेदनगृह व औषधी निर्माण शाळा असावी.

२. सदर संस्थेने वरील अटींची पूर्तता करावी. या अटींची पूर्तता पाहून सन ९० या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत निर्णय घेण्यांत येईल.

आपला विश्वासू,

[र. ग. गोसावी]

कार्यासन अधिकारी.

प्रति,

प्रशासक [सा.प्र.] आयुर्वेद संचालनालय, मुंबई.

उपसंचालक, होमिओपॅथीक व्दारा शासकीय होमिओपॅथीक रुग्णालय, इर्ला न विलेपार्ले, मुंबई.

प्रशासक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, पिरॅमल मॅन्शन, ३ रा मजल २३५ दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई.

दि. २७.१०.

Motiwala (National) Homoeopathic Medical College & Hospital
Nashik